# जागतिक महिला दिन

जळगाव : जागतिक महिला दिनानिमित्त मू.जे.महाविद्यालयातील प्राणीशास्त्र विभागात विद्यार्थिनी आणि महिलांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी महिलांना भेटवस्तू देवून सन्मानित करण्यात आले. प्राणीशास्त्र विभागाचे द्वितीय वर्षाचे विद्यार्थ्यानी कार्यक्रमाचे आयोजन केले होते. प्रस्तावना शोएब खान यांनी केली. विभागप्रमुख आर.एम.राठोड, डॉ.एम.झेड.चोपडा यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. देवेंद्र पाटील यांनी सूत्रसंचालन तर अताउर रेहमान यांनी आभार मानले.